# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### परभणीतील केबीसी कंपनीने केलेल्या फसवणुकीची चौकशी करणेबाबत

**(१) ३४७५६ (२२-१२-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केबीसी या कंपनीने दुप्पट व तिप्पट रक्कम मिळण्याचे आमिष दाखवून परभणी जिल्ह्यातील नागरिकांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेवींची रक्कम सुमारे ३ कोटीं रूपये असून हजारो ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळतील काय,

(३) असल्यास. अद्याप शासनाने केबीसी कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०१९) :** (१), (२) व (३) केबीसी या कंपनीने गुंतवणूकदारांची फसवणूक केल्या प्रकरणी परभणी जिल्ह्यात एकूण १४ गुन्हे दाखल आहेत. तसेच इतर जिल्ह्यातही सदर कंपनीविरुध्द फसवणूक प्रकरणी गुन्हे दाखल आहेत. कंपनीचे संचालक व इतर भागीदार यांना विविध गुन्ह्यात अटक करुन मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

आडगांव पोलीस स्टेशन, नाशिक येथे दाखल गु.र.नं. १५४/२०१४ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४०६, ४६८, ४७१, ४७४, ३४ सह महाराष्ट्र ठेविदारांचे हितसंरक्षण (वित्तीय संस्था) अधिनियम १९९९ चे कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यात केबीसी कंपनीचे संचालक व भागीदार यांचे नावे निष्पन्न झालेल्या एकूण १९ स्थावर मालमत्ता शासन अधिसूचना दि.३१/१०/२०१५ अन्वये जप्त करण्यात आल्या असून सक्षम प्राधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी, उपविभाग नाशिक, जि. नाशिक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) विलंब झालेला नाही.

---

**मिहान (जि.नागपूर) प्रकल्पामधील २३० एकर जमिन रामदेव बाबा यांच्या पतंजली फुड पार्कसाठी अल्प दरात दिल्याबाबत**

**(२) ६८९९५ (१६-१२-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहान प्रकल्पातील १००० कोटी किंमतीचा २३० एकर जागा योग गुरू रामदेवबाबा यांच्या पतंजली आयुर्वेद संस्थेच्या फुड पार्कला दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेची किंमत बाजारभावाने ४ कोटी रूपये प्रति एकर असताना बाबांच्या कंपनीला एमएडीसीने सर्वात कमी म्हणजे २५.५० लाख रूपये प्रतिएकर इतका कमी दर लावण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(५) तसेच बाजार भावापेक्षा इतक्या कमी भावाने जागा देण्याची कारणे काय आहेत, हाच भाव इतर उद्योगांनाही लावण्यात येऊन जमीन देण्यात येणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१९) :** (१) नागपूर येथील मिहान प्रकल्पातील विशेष आर्थिक क्षेत्राबाहेरील २३४.१५ एकर जागा पतंजली फुड ॲण्ड हर्बल पार्क नागपूर प्रा. लि. या कंपनीला ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन दिनांक २२ ऑगस्ट २०१६ रोजी तत्वत: आवंटित करण्यात आली.

(२) म.वि.वि. कंपनीच्या संचालक मंडळाने मंजुर केलेल्या धोरणानुसार किमान आरक्षित दर निर्धारीत करण्यात आला होता. त्यानुसार टंडन समितीने केलेल्या शिफारशी नुसार अन्नप्रक्रिया उद्योगासांठीचा निर्धारित केलेला भुखंड आवंटनासाठीचा न्युनतम किमान दर संचालक मंडळाने स्थापन केलेल्या विशेष समितीतर्फे निर्धारित करण्यात आला. त्यानुसार मुलभूत सुविधांकरिता म.वि.वि. कंपनीला लागणारा खर्च वजा करुन सदर भुखंडासाठी न्युनतम किंमत ६२५ रुपये प्रति चौ.मिटर प्रमाणे निर्धारित करण्यात आली. म.वि.वि. कंपनीने ई-निविदा पध्दतीचा भुखंड आवंटनाची नियमावली अनुसरुन तिसऱ्यांदा आलेल्या प्रतिसादानुसार ६३० रुपये प्रती चौ.मिटर (सुमारे २५.४९२ लक्ष रुपये प्रती एकर) या दराने पतंजली फुड ॲण्ड हर्बल पार्क नागपूर प्रा.लि.संस्थेला भुखंड आवंटीत करण्यात आला.

म.वि.वि.कंपनीने ( मिहान ) येथील विशेष आर्थिक क्षेत्राबाहेरील इतर उदयोगांना पायाभूत सुविधासह भुखंड आवंटित करण्यात येतात, त्यामुळे सदर निकष हे इतर उद्योगांना लागू करणे योग्य ठरेल, असे म्हणता येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) वरील उपप्रश्न क्र.२ चे उत्तर प्रमाणे

---

**परभणी जिल्ह्याचे कॉऑर्डिनेटर पद रिक्त असल्याबाबत**

**(३) ७०५८० (२४-०१-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ई-गव्हर्नन्ससाठी प्रशासन व महाऑनलाईन यामध्ये समन्वय ठेवण्यासाठी निर्माण करण्यात आलेले परभणी जिल्ह्याचे कॉऑर्डिनेटर पद माहे जानेवारी, २०१६ पासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे पद त्वरीत भरण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे कर्मचारी अधिकाऱ्यांनी अनेक वेळा मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ऑनलाईनच्या काळात निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी हे पद त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महाऑनलाईन यांचेकडुन दिनांक २१/०२/२०१७ रोजी परभणी जिल्ह्यासाठी महाऑनलाईनचे जिल्हा प्रतिनिधीची नियुक्ती केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनातील विविध विभागातील ११६ लाचखोर अधिकाऱ्यांचे निलंबनाचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(४) ७४५२४ (२०-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनातील विविध विभागातील ११६ लाचखोर अधिकारी व कर्मचारी यांचे निलंबन करण्यासंदर्भातील प्रस्तावाच्या नस्ती शासनाकडे अनेक महिन्यांपासून प्रलबित असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने जाहिर केले असल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावात गृह विभागातंर्गत नागपूर परिक्षेत्रातील २३, औरंगाबाद १५, नांदेड १५, पुणे ११, मुंबई १५, ग्रामविकास विभाग २६, शिक्षण विभाग २०, सहकार व पणन विभाग १३, महसूल विभाग ११, कृषी विभाग ५, अन्न व नागरी पुरवठा विभाग ५, सार्वजनिक आरोग्य विभाग ५, महावितरण ५ यासह इतर सर्व विभागातील ५ ते ७ अधिकाऱ्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित असलेले प्रस्ताव निकाली काढण्याबाबत तसेच संबधित लाचखोर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशिल काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०१९) :**(१), (२), (३) व (४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा कार्यवाही मधील सोबतच्या परिशिष्टानुसार (दिनांक ०७.०५.२०१८ पर्यंतची स्थिती) जवळपास १२१ आरोपी लोकसेवकांच्या निलंबनाचे आदेश संबंधित विभागाने काढले नाहीत. याबाबत प्रत्येक विभागाच्या निलंबन आढावा समितीच्या बैठकीत वेळोवळी आढावा घेण्यात येतो, तसेच मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीच्या आढावा बैठकीमध्ये याबाबत वेळो वेळी सुचना देण्यात आल्या आहेत.

---

**अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे बस स्थानक परिसरातील**
**अवैध खाजगी वाहतुकीस प्रतिबंधीत करण्याबाबत**

**(५) ८१८०६ (२१-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे बस स्थानक परिसरातील अवैध खाजगी वाहतुकीस प्रतिबंधीत करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास ठाणेदार पोलीस स्टेशन, चांदुर रेल्वे यांना लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत आगार प्रमुख, राज्य परीवहन महामंडळ, चांदुर रेल्वे यांनी वेळोवेळी अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या क्रमांकासह लेखी कळविले असूनही अद्यापही अवैध वाहतूक सुरुच आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अवैध वाहतुकीस प्रतिबंध घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच राज्य परिवहन महामंडळाचे चांदूर रेल्वे येथील आगारप्रमुख यांच्याकडून विषयाधीन निवेदन प्राप्त झाले आहे.

पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे अंतर्गत नियमभंग करणाऱ्या वाहनांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

(आकडे रु.)

| सन | २०१६ | | २०१७ | |
|---|---|---|---|---|
| | केसेस | दंड वसूल | केसेस | दंड वसूल |
| मो.वा.का. अंतर्गत एकूण | २,६६९ | ३,३९,३०० | ४५४ | १,०१,८०० |
| पैकी अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने | ७३ | ७४,१००१६ | १६ | ३४,००० |
| पैकी बस स्थानक परिसरात उभी वाहने | ३६ | १३,६०० | १८ | ३,६०० |

अवैध प्रवासी वाहतुकीस प्रतिबंध व्हावा यादृष्टीने ज्या वाहनांवर दोन किंवा त्यापेक्षा जास्त केसेस झालेल्या आहेत अशा १० वाहनांविरुध्द प्रादेशिक परिवहन विभाग, अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाहीकरीता प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत.

(४) विषयांकीत प्रकरणी कारवाईस विलंब झालेला नाही.

---

**घोडबंदर ( जि. ठाणे ) येथील श्री. अमोल भोईर यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन चौकशी करण्याबाबत**

**(६) ८६५२८ (०४-०९-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर ( जि. ठाणे ) येथील श्री.अमोल भोईर यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन चौकशी करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी पोलिस आयुक्त , ठाणे यांचेकडे माहे जुन,२०१७ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान तसेच वारंवार तक्रारीही केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केलेली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१९) :** (१) नाही,

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबड एम.आय.डी.सी. (नाशिक) येथील संजीवनी इन्फ्रास्ट्रक्चर आणि क्लस्टर इन्फ्रास्ट्रक्चर या कारखान्यांनी केलेली फसवणूक

**(७) ८८७९४ (१८-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड एम.आय.डी.सी. नाशिक येथील संजीवनी इन्फ्रास्ट्रक्चर आणि क्लस्टर इन्फ्रास्ट्रक्चर या कारखान्यात बनावट धनादेश व स्वाक्षरी करुन लाखो रुपयांची फसवणुक केल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती दोषी असलेल्या संबंधीतांवर शासनाने काेणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,त्याची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) संजीवणी इन्फ्रास्ट्रक्चर व क्लस्टर इन्फ्रास्ट्रक्चर करीता स्टील मेटल खरेदीची ऑर्डर देवून फिर्यादी यांची एकूण रु.७६,४५,१०९/- ची फसवणूक केल्या प्रकरणी एकूण ५ आरोपींविरूध्द अंबड पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.नं.२५६/२०१७ भा. दं. वि. कलम ४२०, ४०६, ३४ प्रमाणे दि.१४/०६/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी दि.०३/०९/२०१७ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, ५ आरोपीतांवर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे आरोपपत्र दाखल केले आहे.

---

## पोलिसांकडून कायद्याचे तसेच. मा. सर्वोच्च तसेच मा. उच्च न्यायलायांच्या निर्देशांचे काटेकोर पालन होण्याबाबत

**(८) ९२४१५ (०४-०९-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांना कायद्यानुसार आरोपीकडून गुन्ह्याची कबुली देणारा जबाब नोंदविण्याचा व त्यावर आरोपीची सही वा अंगठा घेण्याचा अधिकार नसतानाही पोलिसांकडून सर्रास या कायद्याचे उल्लंघन करण्यात येत आहे, असे ताशेरे मारून मा. उच्च न्यायालयाने हा प्रकार बंद करण्याचे आदेश माहे मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिलेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आय.पी.सी. च्या ४९८ (अ), ३५४ तसेच घरगुती हिंसाचार कायद्याच्या तक्रारी संदर्भातील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्देशांचेही पालन पोलिसांकडून होत नसल्याच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांकडून कायद्याचे तसेच. मा. सर्वोच्च तसेच मा. उच्च न्यायलायांच्या निर्देशांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

मा. उच्च न्यायालयाने यासंबंधात आदेश दिल्याचे उपलब्ध अभिलेखावर दिसून येत नाही.

याबाबत फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ मधील तरतूदीस अनुसरुन कार्यवाही करण्यात येते.

(२) व (३) कलम ४९८(अ) भादंवि च्या संदर्भात परवानगीशिवाय अटक करु नये असे निर्देश दिलेले आहेत.

कलम ३५४ भादंवि संदर्भाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्देशांचे पालन करण्याबाबत व त्या अनुषंगाने इतर खबरदारीच्या उपाययोजना यासंदर्भात सर्व पोलीस घटकांना पोलीस महासंचालक यांच्या मार्फतीने वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा शहरातील मध्यवस्तीत असलेले जिल्हा कारागृह शहराबाहेर शासकीय जागेत हलविणेबाबत**

**(९) ९२४८२ (०४-०९-२०१७). श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (सातारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा शहराच्या मध्यवस्तीत जिल्हा कारागृहाची इमारत असून या कारागृहामुळे त्या परिसरात बांधकाम करण्यास मज्जाव असल्यामुळे त्या परिसरातील नागरिकांना त्यांच्या घरांची दुरुस्ती करता येत नाही, त्यांना स्वतःच्या जागेत नवीन घर अथवा इमारत बांधता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारागृहातील कैद्यांची ये- जा आणि त्यांच्या समर्थकांच्या गर्दीमुळे शहराचा मध्यवर्ती भाग नेहमीच संवेदनशील असतो, या परिसरात नागरी वस्तीसह शाळा, महाविद्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, खाजगी व इतर अनेक संस्थांची कार्यालये आहेत तसेच या परिसरात मोबाईल जॅमर असल्याने या परिसरातील शासकीय, निम्न शासकीय, खाजगी कार्यालये आणि इतर व्यावसायिक यांच्या दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत अनेक वर्षांपासून जिल्हा कारागृह इतरत्र हलवण्याची मागणी तेथील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा कारागृह शहराबाहेर नेल्यास शहरातील कारागृहाची इमारत पोलीस दल अथवा अन्य शासकीय विभागासाठी उपयुक्त ठरू शकते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या परिसरातील नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी जिल्हा कारागृह शहराबाहेर हलविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सातारा कारागृहाजवळच सातारा शहर पोलीस स्टेशन व समोरच पोलीस मुख्यालय असल्यामुळे कारागृह परिसरात संवेदनशील घटना घडल्याची नोंद नाही.

तसेच, कारागृहात बसविण्यात आलेले मोबाईल जॅमर हे हवा विरहित असल्याने, मोबाईल जॅमरची मर्यादा ही फक्त कारागृहाच्या आतील परिसराकरीता ठेवण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

नागरिकांनी अशी कोणतीही मागणी केलेली नाही.

(४), (५), व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे.बाळकूम (ठाणे) येथील विकास आराखड्याची मुळ नस्ती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,ठाणे यांचेकडून म.न.पा. ठाणे यांना देणेबाबत**

**(१०) ९५१०३ (०६-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे म.न.पालिकेतील मौजे.बाळकूम,येथील विकास आराखडा क्र.८८/०१०/टी.एम.सी./टी.डी.डी./०१/०४/१९९२ नुसार मंजूर आराखड्याची मुळ नस्ती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,ठाणे यांनी चौकशीकरीता सन १९९५ ला ठाणे म.न.पा. कडून ताब्यात घेतली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नस्ती आजतागायत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,ठाणे यांचे ताब्यात असल्याने आराखड्यातील वापर परवान्याच्या प्रतिक्षेत असलेल्या मे.सत्यवंदन को.ऑप.हौ.सोसायटीने दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी तसेच म.न.पा. ठाणे यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजीचे पत्रान्वये चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली असल्यास वा आवश्यकता नसल्यास मुळ नस्ती म.न.पा.कडे सत्वर हस्तांतर करणेसाठी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी न्यायालयीन निर्णय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांचेकडून सदर आराखड्याची मुळ कागदपत्रे (नस्ती) म.न.पा.ठाणे यांचे ताब्यात देण्यास विलंब झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मुळ कागदपत्रे (नस्ती) लवकरात लवकर म.न.पा.ठाणे यांचे ताब्यात देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०१९) :**(१) होय.

(२), (३), (४) व (५) प्रस्तुत विकास आराखड्यां संबंधीची न्यायालयीन प्रक्रीया अद्यापही पुर्ण झाली नसल्याने सदरची नस्ती न्यायालयात प्रलंबीत असल्याने सदर नस्ती ठाणे महानगर

पालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली नाही. न्यायालयीन प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याने या प्रकरणी कोणताही विलंब झालेला नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील महावितरण कंपनीच्या अधिकारी-कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना पकडल्याबाबत**

**(११) ९८२१४ (०६-०१-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील महावितरण कंपनीच्या स्थापत्य विभागासाठी भाडेतत्वावर देण्यात आलेल्या वाहनाचे माहे जून महिन्याचे भाडे तथा अनामत रक्कमेचा धनादेश परत देण्यासाठी सहा हजार रूपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी अतिरिक्त कार्यकारी अधिकारी ( वर्ग १ ) आणि मध्यस्थ सहा. अभियंता ( वर्ग-२) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) होय,

(२) व (३) आरोपी लोकसेवक श्री. गजेंद्र प्रल्हादराव सरनाईक, यांनी श्री. किसन भास्कर तोंडे यांच्याकडून आरोपी लोकसेवक श्री. राहुल विलास पवार यांच्या मार्फतीने लाच स्विकारल्यामुळे त्यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमातील कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

याशिवाय महावितरण कंपनी मर्या यांनी दोन्ही आरोपी लोकसेवकांना निलंबीत केले असून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेतील सहा. कनिष्ठ लिपिक यांना लाच घेतांना अटक करण्यात आल्याबाबत**

**(१२) १०२६१९ (०६-०१-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेतील सहा. कनिष्ठ लिपिक राजेश कुंभार यांना रजा मान्यतेचे प्रमाणपत्र देण्यासाठी ५ हजार रुपयांची लाच घेतांना दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करून अद्यापपर्यंत काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) होय,
(२) व (३), आरोपी लोकसेवक राजेश पांडुरंग कुंभार यांच्या विरूध्द शाहू पूरी पोलीस ठाणे जिल्हा कोल्हापूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी सदर आरोपी लोकसेवकास शासन सेवेतून निलंबित केले आहेत.

---

## नवी मुंबई येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती अश्विनी बिंद्रे यांचे बेपत्ता झाल्याचे प्रकरण

**(१३) १०६१८४ (१२-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिंद्रे-गोरे दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारापासून बेपत्ता झाल्या प्रकरणामध्ये पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी सामील असून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकारी सदर दोषी पोलीस अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास याप्रकरणी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान नवी मुंबई पोलीस आयुक्तांची ब्रिंदे यांच्या कुटूंबियांनी भेट घेतली असता, कोणतेही सहकार्य न करता त्यांना भिती दाखवून तुमच्या जीवाला धोका असल्याचे सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ब्रिंदे कुटूंबियांनी याप्रकरणी नवी मुंबईचे पोलीस आयुक्तांना सहआरोपी करावी, अशी मागणी दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी नवी मुंबई पोलीसांनी, पो.निरीक्षक अभय कुरुंदकर व जळगाव येथून राजेश पाटील यांना ताब्यात घेण्यात आले असून सदर प्रकरणी आरोपींना सर्व पुरावे नष्ट करणे व आवश्यक ती माहिती गायब करण्याकरीता पुरेसा अवधी मिळणेबाबत सहकार्य करणाऱ्या नवी मुंबई पो.आयुक्त हेमंत नगराळे यांचे नाव प्रामुख्याने संशयीत म्हणून घेतले जात असतानाही व सर्व घटनाक्रम बघता त्यांचे वर्तन सकृत दर्शनी संशयास्पद आढळून

येऊनही चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना या प्रकरणात सहआरोपी म्हणून घोषित न करण्यात येण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४), (५) व (६) बिंद्रे कुटूंबियांनी पत्रकार परिषद घेत असले बाबतची माहिती पोलीसांना दिलेली नव्हती परंतू वर्तमान पत्रातील मजकुरावरुन पत्रकार परिषद घेतल्याचे समजते.

सदर प्रकरणी प्रथम अश्विनी बिद्रे हरविले बाबत कळंबोली पोलीस ठाणे मिसिंग रजि.नं. ४५/२०१६, दिनांक ११/७/२०१६ अन्वये दाखल करण्यात आली होती. सदर मिसींगचे चौकशीमध्ये गुन्ह्याचा प्रकार असल्याचे निष्पन्न झाल्याने कळंबोली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं.२९/२०१७ भादंवि सं.३६४, ५०६(२), ४९७, ३२३, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यात आरोपीत नामे १) अभय शामसुंदर कुरुदकर, २) ज्ञानदेव दत्तात्रेय पाटील उर्फ राजू पाटील, ३) कुंदन भंडारी व ४) महेश फळणीकर यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

गुन्ह्याच्या तपासात पोलीस आयुक्त, श्री.हेमंत नगराळे यांचे विरुध्दचे तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मरोळ पाईपलाईन परिसरात राहणाऱ्या झोपडपट्टी धारकांच्या पुनर्वसनाबाबत**

**(१४) १०८०३१ (१२-०४-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पाईपलाईन जवळील झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी मरोळ व दिंडोशी येथे १० हजार ६०० घरे बांधण्याचे निवेदन मा.उच्च न्यायालयाने करूनही अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात सन २००९-१०, २०१०-११, २०११-१२ साली अनुक्रमे सुमारे १ कोटी, २५ कोटी व ८५ कोटी रुपयांची तरतूद करूनही त्याचा वापर केला गेला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मरोळ पाईपलाईन परिसरातील झोपडपट्टीधारकांना माहूल गाव येथे पर्यायी घर देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहूल गावातील घरांसाठी महानगरपालिकेला प्रचंड आर्थिक ताण सहन करावा लागणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निवेदनानंतरही त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१) मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या तानसा पाईपलाईनच्या बाजूच्या १० मीटरच्या परिसरातील अतिक्रमणे हटवून पाईपलाईनच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर परिसर मोकळा करण्यात यावा असे आदेश मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक १४०/२००६ मध्ये दिले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) मरोळ पाईप लाईन परिसरातील बाधीत झोपडीधारकांना इमारत क्रमांक २८, ३८ व ५६ येथे पर्यायी घरे देण्यात आली आहेत.
(४) व (५) महानगरपालिकेच्या पात्र प्रकल्प बाधीतांचे पुनर्वसन महानगरपालिकेमार्फत माहूल येथील एव्हरस्माईल प्रकल्पात करण्यात येत असून, संकुलामधील काही सदनिकाधारकांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमध्ये मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही सुरु असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## कर्कापूर( ता.तुमसर जि.भंडारा) येथील घरे व शेतामध्ये सतत लागणाऱ्या आगींच्या प्रकरणांबाबत

**(१५) १०८०७६ (१२-०४-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कार्कापूर (ता.तुमसर जि.भंडारा) येथील घरे व शेतातील धानाचे पुंजणे, चाऱ्याला मागील ४० वर्षापासून अचानक आग लागून होत असलेली नुकसानीचे निर्मुलन करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे यासंदर्भातील दिनांक २६.०७.२०१७ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) दिनांक १३.०४.२०१७ रोजी पो.स्टे.सिहोरा मार्फत मौ.कर्कापूर या गांवातील तनशीच्या ढिगाऱ्याला लागलेल्या आगीची सूचनेवरुन चौकशी करण्यांत आली. तसेच गांवातील ८ गांवकऱ्यांच्या घराला, गोठ्याला व तनशीच्या ढिगाऱ्याला आश्चर्यकारकरित्या आग लागल्याची

तसेच घरावर गुलाल, बुक्का, तांदूळाची तसेच दगडफेक झाल्याची माहिती स्थानिक पोलीस पाटील यांचेकडून व स्थानिक लोकांकडून पोलीसांना प्राप्त झाली. मात्र कोणीही संशयीत व्यक्ती अशा प्रकारचे कृत्य करीत असल्याचे दिसून आले नाही.

कर्कापूर येथील आगीचे पंचनामे तलाठ्यामार्फत करण्यांत आलेले आहेत. तसेच कर्कापूर येथील मातीचे नमुने भु-विज्ञान व खनिकर्म विभाग, नागपूर यांचेकडे तर पाण्याचे नमुने भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे तपासणीसाठी पाठविण्यांत आले होते. परंतु आगीचे कारण समजू शकले नाही.

गांवातील नागरीकांमध्ये शांतता कायम राहावी व भितीमुक्त वातावरण रहावे याकरीता अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या जिल्हाध्यक्षांना गांवात पाचारण करण्यांत आले. त्यांनी गांवातील लागलेल्या आगीबाबत गांवकऱ्यांना सुबोधनकारक कार्यक्रम दाखवून त्यांच्या मनातील अंधश्रध्देबाबतची भिती दूर केली. तसेच फिरते पोलीस स्टेशन संकल्पा मोहिमेद्वारे सदर गांवात फिरते पोलीस स्टेशन आयोजीत करुन गांवात घडलेल्या सदर घटनेमुळे गांवकरी अंधश्रध्देच्या आहारी न जाता त्या दृष्टीकोनातून गांवकऱ्यांना अंधश्रध्देच्या आहारी न जाण्याबाबत मार्गदर्शन करण्यांत आले. त्यानंतर सदर गांवात अशा प्रकारच्या घटना घडून आल्या नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मीरा भाईंदर महानगरपालिकेचा परिवहन सेवा ठेका मिळविताना झालेल्या भ्रष्टाचाराबाबत**

**(१६) १०८७२२ (१४-०४-२०१८). श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा भाईंदर महानगरपालिकेची परिवहन सेवा ठेका पद्धतीने मिळावी याकरिता शामा शाम या खाजगी कंपनीच्या ठेकेदारने येथील स्थानिक लोकप्रतिनिधींना रूपये २५ लाखाची लाच देताना दिनांक ८ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांनी ठेकेदारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे कंत्राट संबंधित ठेकेदारास देवू नये याकरिता मा.स्थायी समितीने ठेकेदाराच्या हिताचा विचार करून मंजूर केलेला ठराव विखंडित करण्याबाबत मा.लोकाप्रतीनिधी यांनी शासनाकडे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास , असे असताना देखील सदरचा ठराव विखंडीत न करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा भ्रष्ट ठेकेदारास सदरचा ठेका देणेबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०१९) :** (१), (२) व (३) होय,

(४) व (५) महापालिका स्तरावरुन ठेका देण्यासंबंधीचे Letter of Award/Acceptance (LOA) मागे घेण्यात आले आहे.

---

**पुणे शहरातील प्राणघातक अपघातांची सर्वाधिक ठिकाणे ही मुंबई-बंगळुरू महामार्गांवर असल्याबाबत**

**(१७) ११०१५६ (१४-०४-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे पोलीसांच्या वाहतूक शाखेने शहरातील प्राणघातक अपघातांची ३६ ठिकाणे निश्चित केली असून त्यात सर्वाधिक ठिकाणे ही मुंबई-बंगळुरू महामार्गावरील असल्याची बाब माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अपघातांचे प्रमाण कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे. निश्चित केलेल्या ३६ पैकी ११ ब्लॅकस्पॉट ठिकाणे ही मुंबई बंगलोर महामार्गावरील आहेत.

(२) व (३) वाहतूक शाखेकडून निश्चित केलेल्या एकूण ३६ ब्लॅकस्पॉट येथील अपघात कमी होण्याकरीता आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण तसेच पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी, पुणे यांना सूचित करण्यांत आले आहे. त्यानुसार संबंधीत यंत्रणांनी सिग्नल यंत्रणा उभारणे, पादचाऱ्यांकरीता भुयारी मार्ग बांधणे, रस्ता रुंदीकरण, उड्डाणपूल उभारणे, झेब्रा क्रॉसींग व लेन मार्गिकेचे पट्टे मारणे, आवश्यक तेथे सूचनाफलक बसविणे, पुनर्डांबरीकरण इ. कामे केलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ ( जि. कोल्हापूर ) येथील राजाराम माने यांच्या आत्महत्या प्रकरणी पोलीस उप अधिक्षक (डीवायएसपी) यांची खातेनिहाय चौकशी करण्याबाबत**

**(१८) ११०७०२ (१२-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि. कोल्हापूर) येथील राजाराम माने यांच्या आत्महत्या प्रकरणी पोलीस उप अधिक्षक (डीवायएसपी) श्री.सरवदे यांची खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९)** :(१), (२) व (३) होय,

या प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक यांच्याकडून शासनास दिनांक १४.०१.२०१९ रोजी प्राप्त झाला असून त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**जंजिरा किल्ल्यावरील जल वाहतूक सेवा बंद ठेवण्याबाबत**

**(१९) ११२६९३ (१७-०४-२०१८). श्री. मनोहर गजानन भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाचे मुरूड येथील बंदर निरिक्षक यांनी दिनांक १ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जंजिरा किल्ल्यावरील जल वाहतूक सेवा बंद ठेवण्याचा लेखी आदेश दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ,
(३) असल्यास, सदरची जल वाहतूक सेवा पुन्हा सुरू करण्याबाबत शासनान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१९) :** (१) होय.
(२) नौकेमध्ये नोंदणी प्रमाणपत्र, उतारु परवाना, विमा पत्र यांच्या छायांकीत प्रती ठेवणे तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी लाईफ जॅकेट, लाईफ बोया,राफ्ट इत्यादी ठेवणे. तसेच नौकेवर नाव व नंबर लिहिणे, नौकानयनाकरीता नौका दूर नांगरणे आणि तिकीट मास्टर/प्रवासी गाईड यांचे ओळखपत्र असणे या अटींचे पालन करण्यासाठी बंदर निरिक्षक, राजपूरी बंदर यांनी दिनांक २९.११.२०१७ रोजी नोटीस होती.
(३) संबंधित संस्थेने अटी/शर्तीचे पालन करुनच प्रवासी वाहतूक करीत असल्याचे हमी देण्याचे अनुक्रमे दिनांक २९.११.२०१७ व दिनांक ०१.१२.२०१७ अन्वये लेख पत्र दिल्यानंतर प्रवासी वाहतूक त्वरित सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सामाजिक बहिष्कार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या गुन्ह्याबाबत**

**(२०) ११२७९७ (०७-०४-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक ३ जुलै,२०१७ पासून अंमलबजावणी सुरु असलेल्या सामाजिक बहिष्कार कायद्याअंतर्गत विविध पोलीस स्टेशनमध्ये १५ गुन्हे दाखल झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,उक्त गुन्हे कोणकोणत्या कारणासाठी दाखल करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यात दिनांक ३ जुलै, २०१७ पासून ते मार्च २०१८ पर्यंत सामाजिक बहिष्कार कायद्याअंतर्गत विविध पोलीस स्टेशनमध्ये २३ गुन्हे दाखल आहेत.

(२) जात पंचायतीस विरोध केला म्हणून कुटूंबास जातीतून बहिष्कृत करणे, कुटूंबावर सामाजिक, आर्थिक व धार्मिक बहिष्कार घालून समाजातून वाळीत टाकणे, समाजातील जाती बाहेरील मुलीशी विवाह केली म्हणून समाजात सभासदत्व दिले नाही, धार्मिक कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यास विरोध करणे, समाजातील होणारे विविध कार्यक्रमाचे व विधीचे निमंत्रण नाकारून समाजाकडून कोणतेही सहकार्य न होणे इत्यादी कारणास्तव फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण अधिनियम, २०१६ अन्वये अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

(३) व (४) सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण अधिनियम, २०१६ अन्वये खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

| अ.क्र. | गुन्हा नोंद असलेले पो. स्टे. | गुन्हा क्र. | गुन्ह्यात नोंदविलेले कलमे. |
|---|---|---|---|
| १ | नगर तालुका पोलीस ठाणे, अहमदनगर. | २४०/२०१७ | भादवि कलम ३८४, सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(२)(३). |
| २ | वैभववाडी पोलीस ठाणे, सिंधुदूर्ग. | ८१/२०१७ | भादवि कलम ३८४, सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(३)(४)(८)(१०)(१२)(१५)(१६), ४, ५, ६, ७. |
| ३ | कुडाळ पोलीस ठाणे, सिंधुदूर्ग. | १८९/२०१७ | सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(३)(४)(६),४, ५. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | उस्मानाबाद शहर पोलीस ठाणे, उस्मानाबाद. | २२७/२०१७ | भादवि कलम ३८४, ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ५ व ६. |
| ५ | ढोकी पोलीस ठाणे, उस्मानाबाद. | २०६/२०१७ | भादवि कलम ३८४, ५०६, ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ४, ५. |
| ६ | खडक पोलीस ठाणे, पुणे शहर. | ३८५/२०१७ | भादवि कलम ३८५, ५००, ५०६, ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३ (८)(१५), ५. |
| ७ | खडकी पोलीस ठाणे, पुणे शहर. | ३१८५/२०१७ | भादवि कलम ३८४, सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(३)(४)(८)(१०)(१२)(१५)(१६), ४, ५, ६, ७. |
| ८ | सांगली पोलीस ठाणे, सांगली. | ४६/२०१७ | सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(३)(६) ५. |
| ९ | जुन्नर पोलीस ठाणे, पुणे ग्रामिण. | १९८/२०१७ | भादवि कलम ५०६, सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(४). |
| १० | लष्कर पोलीस ठाणे, पुणे शहर. | २३०/२०१७ | भादवि कलम ३८४, ३२३, ५०४, ५०६, ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(२)(४)(५)(१५). |
| ११ | संगमेश्वर पोलीस ठाणे, रत्नागिरी. | ८८/२०१७ | भादवि कलम १२०(ब), सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(३)(४)(८)(१०)(१५). |
| १२ | नळदूर्ग पोलीस ठाणे, उस्मानाबाद. | २६८/२०१७ | भादवि कलम ३८४, ३२३, ५०४, ५०६, ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ४, ५. |
| १३ | उपनगर पोलीस ठाणे, नंदूरबार. | २२६/२०१७ | भादवि कलम ३२३, ५०४, ५०६, ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(३)(६), ५. |
| १४ | जयगड पोलीस ठाणे, रत्नागिरी | ४०/२०१७ | भादवि कलम ३२३, ५०४, ५०६, ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(२)(४)(५)(६)(८)(९)(१२)(१५). |
| १५ | महाबळेश्वर पोलीस ठाणे, सातारा. | ८८/२०१७ | भादवि कलम ५०४, ५०६, ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३, ५. |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | दापोली पोलीस ठाणे, रत्नागिरी. | २१५/२०१७ | सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३, ४, ५, ६ |
| १७ | पोयनाड पोलीस ठाणे, रायगड. | १४४/२०१७ | भादवि कलम १५३ अ, ५०६, ३८४, ३८५, ३७९, १२० ब, ३४. |
| १८ | लोणावळा ग्रामिण पोलीस ठाणे, पुणे ग्रामिण | १९१/२०१७ | भादवि कलम ३०७, ३४२, ३६५, १४१, १४३, १४९, ५०४, ५०६ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(८), ४, ५, ७. |
| १९ | चिपळून पोलीस ठाणे, रत्नागिरी. | ०६/२०१८ | भादवि कलम १५३ अ, ५०६, ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ४, ५, ६ व ७. |
| २० | इतवारा पोलीस ठाणे, नांदेड. | ३३/२०१८ | भादवि कलम ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(२)(४)(८), ४, ५, ७. |
| २१ | धानोरा पोलीस ठाणे, गडचिरोली | १२/२०१८ | भादवि कलम ३७६, ५०६, २०२, ३४ सह पोक्सो कायदा कलम ४,६, २१(अ), सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(४)(१२)(१३). |
| २२ | त्र्यंबकेश्वर पोलीस ठाणे, नाशिक ग्रामिण. | ०२/२०१८ | भादवि कलम १७६, ३४ सह सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ३, ५, ७. |
| २३ | महाड एमआयडीसी पोलीस ठाणे, रायगड | २१/२०१८ | सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम कलम ५, ६, ७. |

---

## नागपूर येथील गोसेखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पातील कालव्याच्या बांधकाम निविदेत झालेला गैरव्यवहार

**(२१) ११२९११ (१३-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील गोसेखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पातील कालव्याच्या बांधकाम निविदेतील गैरव्यवहार प्रकरणी ५ अधिकारी, कंत्राटदारांसह एकूण १२ आरोपींविरुध्द ४ हजार ५०० पानांचे दोषारोपपत्र दाखल केल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,त्यानूसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१), (२) व (३) होय,

दोषींवर पोलीस स्टेशन सदर नागपूर शहर अपराध क्र. ३३०९/२०१६ कलम १३(१)(क), १३(१)(ड), सह १३(२) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ व सह कलम ४२०, ४६८, ४७१, १०९, १२०(ब) भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करून सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र क्र. ०२/२०१८ अन्वये मा. विशेष न्यायालय नागपूर येथे दाखल करण्यात आले असुन प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

**गत वर्षभरात राज्यातील भिकाऱ्यांवर करण्यात आलेल्या कारवाईबाबत**

**(२२) ११४१३९ (१२-०४-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गत वर्षभरात राज्यात १५३९ तर पुणे शहरात केवळ १०८ भिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आल्याची बाब दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र भिकारीमुक्त अभियानास पोलीस प्रशासनाचे सहकार्य मिळत नसल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सन २०१७ मध्ये भिक्षेकरी प्रतिबंध कायद्याअंतर्गत राज्यात एकूण ८,१४८ भिकाऱ्यांवर तर पुणे शहरात ११४ भिकाऱ्यांवर कारवाई करण्यांत आलेली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

पोलीस प्रशासनातर्फे नियमितपणे योग्य ती कारवाई तसेच सहकार्य करण्यांत येते. महाराष्ट्र भिकारीमुक्त अभियान या विषयान्वये होणाऱ्या बैठकांमध्ये महाराष्ट्र भिकारीमुक्त अभियानाबाबत माहिती दिली जाते. पोलीस यंत्रणेकडून भिक्षेकरीगृहांना पत्र देवून त्यांची मदत घेऊन भिक्षेकरी यांचेविरुध्द कालबध्द पध्दतीने कार्यवाही करण्यांत येते. महाराष्ट्र भिकारीमुक्त अभियानादरम्यान भिक्षा मागणारे अल्पवयीन मुले / मुली तसेच त्यांना भिक्षा मागण्यांस प्रवृत्त करणारे त्यांचे पालक व भिक मागण्याकरीता मुलांचे अपहरण करणाऱ्या टोळ्या यांचा वेळोवेळी शोध घेऊन भिक्षेकरी कायद्यान्वये कारवाई करण्यांत येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मागील तीन वर्षात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कामगिरी खालावत असल्याबाबत**

**(२३) ११५१५६ (११-०४-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील तीन वर्षात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कामगिरी खालावत असून सन २०१४ मध्ये राज्यात गुन्हा सिध्द होण्याचे प्रमाण अवघे २९ टक्के इतके असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ मध्ये ते २३ टक्क्यांवर आले आणि सन २०१६ आणि २०१७ मध्ये यात आणखी घट होऊन अनुक्रमे २० आणि १४ टक्के गुन्हेगारांना शिक्षा झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७ मध्ये नाशिक परिक्षेत्रात ४७ संशयीत आरोपींपैकी ४१ जणांना कोर्टाने सबळ पुराव्यांअभावी निर्दोष सोडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचा (एटीएस) कारभार सुधारण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) व (२) सन २०१४ मध्ये ६१ गुन्हयातील ७६ आरोपीतांना शिक्षा झालेली असून २०१४ मधील गुन्हयाच्या सिध्दीची प्रमाणे २८% होते. तसेच

१. सन २०१५ मध्ये २३ टक्के (१२० गुन्हे १३९ आरोपीत इसम)

२. सन २०१६ मध्ये २१ टक्के (९१ गुन्हे १०७ आरोपीत इसम)

३. सन २०१७ मध्ये १६ टक्के गुन्हच्या सिध्दीचे प्रमाणे होते.

(३) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक मध्ये सन २०१७ मध्ये ३९ खटले निर्दोष सुटले. सदर निर्दोष झालेल्या खटल्यांमध्ये एकुण ५० आरोपी लोकसेवक यांना मा. न्यायालयाने निर्दोष मुक्त केलेले आहे.

(४) व (५) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत मोबाईल ॲप, टोल फ्री.क्रं. १०६४, ही हेल्पलाईन, ९९३०९९७७०० हा What Sapp नंबर तसेच Facebook page प्रसिध्द करून जन जागृती करण्यात येते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावरून सामान्य जनतेसाठी सर्व माहिती उपलब्ध केली जात आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालयात जावून भेटी देवून माहिती देत असतात व त्यांच्या कार्यक्षेत्रातील आठवडे बाजार, एसटी स्टॅण्ड, रेल्वेस्टेशन, कॉलेज इत्यादी ठिकाणी जाऊन सुध्दा जनजागृती करत असतात. तसेच शासकिय कार्यालयाच्या दर्शनी भागावर लाचलुचपत प्रतिबंधंक विभागाबाबत माहिती प्रसिध्द केली जाते.

___________

**चिपळून (जि.रत्नागिरी) वाहतूक शाखेचे हवालदार यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच मागताना अटक केल्याबाबत**

**(२४) ११६०१८ (१२-०४-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) चिपळून (जि.रत्नागिरी) वाहतूक शाखेचे हवालदार श्री.गणेश नाले यांना वाळूच्या गाडीमालकाकडून दरमहिना रुपये १२ हजाराची लाच मागताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक १४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :**(१) होय,

आरोपी लोकसेवक गणेश भागवत नाळे, वय ४७ वर्ष, यांना पोलीस हवालदार/ ७११ चिपळूण पोलीस स्टेशन अंतर्गत बहाददुरशेख नाका पोलीस चौकी, ता. चिपळूण, यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन तकारदार श्री. नवनाथ लक्ष्मण हिरवे, रा.मु.पो. मेढा ता.जावळी, जि. सातारा यांच्या वाळू वाहतुकीच्या गाड्यांची बहाददुरशेख नाका चिपळूण येथे अडवणुक व गाड्यांवर कारवाई न करणेकरीता प्रत्येक गाडीकरीता मासिक हप्ता ४०००/- रुपये प्रमाणे तीन गाड्यांचे १२,०००/- रुपये लाचेची मागणी करुन दिनांक १५/०१/२०१८ रोजी १२,०००/- रुपये लाच स्विकारतांना आरोपी लोकसेवक गणेश भागवत नाळे, यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी येथील अधिकाऱ्यांनी १९:२५ वा. चे सुमारास पकडून त्यांचेविरुध्द चिपळूण पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्रमांक १४/२०१८, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १३ (१) (ड) सह, १३(२) प्रमाणे दिनांक १६/०१/२०१८ रोजी ०९:४३ वा. गुन्हा दाखल करुन सदर गुन्ह्यात १६/०१/२०१८ रोजी १०:२९ वा. अटक केली आहे.

(२) आरोपी लोकसेवक गणेश भागवत नाळे यांचेविरुध्द दाखल गुन्ह्याचा तपास पुर्ण करण्यात आला असुन त्यांचेविरूध्द मा. विशेष न्यायालय, खेड, जि. रत्नागिरी येथे दि.१९/०६/१८ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असुन त्याचा कोट केस क्र. २५/२०१८ असा आहे. सदर केस न्यायप्रविष्ठ आहे.

(३) व (४) आरोपी लोकसेवक गणेश भागवत नाळे यांना पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांनी त्यांचेकडील जा.क्र.आस्था - २/निलंबन - नाळे/२१४६/२०१८, दिनांक १६/०१/२०१८ अन्वये गुन्हा दाखल झाल्यापासून निलंबित केलेले आहे. तसेच आलोसे नाळे यांच्या विरूध्द मा. विशेष न्यायालय खेड जिल्हा रत्नागीरी येथे दिनांक १९.०६.२०१८ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आसून त्याचा कोर्ट केस क्र. २५/२०१८ असा आहे. सदर केस न्यायप्रविष्ठ आहे.

---

**राज्यातील कारागृहात बंदिस्त कैद्यांच्या सुरक्षेबाबत नेमलेल्या न्यायमूर्ती रामकृष्णन समितीचा अहवालाबाबत**

**(२५) ११६९४३ (२६-०७-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कारागृहात बंदिस्त कैद्यांच्या सुरक्षिततेबाबत नेमलेल्या न्यायमूर्ती रामकृष्णन समितीचा अहवाल शासनास माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, समितीने कारागृहातील सेवा व सुधारणांवर भर देत बराकीतील कैद्यांची गर्दी कमी होण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, तुरुंगातील कैद्यांच्या क्षमतेबाबत राज्याने उपाययोजना कराव्यात अशी मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी सुचनाही दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचना व न्यायमूर्ती रामकृष्णन समितीच्या शिफारशींनुसार निर्णय घेऊन कारागृहांची स्थिती सुधारण्याबाबत तसेच कैद्यांना सुरक्षा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, मुंबईतील आर्थर रोड कारागृहाचे विभाजन करून नजीकच्या मानखुर्द येथे नवीन कारागृह प्रस्तावित असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

राधाकृष्णन समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून, छाननी सुरु आहे.

(३) व (४) होय हे खरे आहे. मा. सर्वोच्च न्यायालयामार्फत वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने, राज्यात वर्धा, यवतमाळ, सिंधूदूर्ग लातूर, धुळे व रत्नागिरी विशेष कारागृह येथे खुले कारागृह गृह विभाग, अधिसूचना दि. २२.०६.२०१८ च्या अधिसूचनेनुसार स्थापन करण्यात आली आहेत.

(५) मुंबई परिसरात नवीन कारागृह बांधणेकरीता मौजे मंडाळा व मौजे तुर्भे येथील ५ एकर जागा हस्तांतरीत करण्यात आली आहे. सदर जागेची ताबा पावती व नकाशा नगर भूमापन अधिकारी, चेंबूर, मुंबई यांचेकडून प्राप्त झाला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड शहरातील बॉम्ब शोधक व नाशक पथकाला कायमस्वरुपी अधिकारी नसल्याबाबत**

**(२६) ११७९०७ (२५-०७-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहराची ओळख ही अतिसंवेदनशील म्हणून पोलीस दफ्तरी नोंद आहे, असे असतानाही येथील बॉम्ब शोधक व नाशक पथक अधिका-याविना सुरु असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड शहर तेलगंणा व कर्नाटक या राज्याच्या सीमेवर वसलेले असुन या परिसराच्या आसपासच्या अदिलाबाद, किनवट, माहूर या परिसरात नक्षलवाद्यांचा संचार असतो तसेच दक्षिण काशी म्हणुन सचखंड गुरुद्वारा हा जगभर प्रसिध्द असुन या गुरुद्वाराचे दर्शन घेण्यासाठी देश विदेशातील शीख बांधव येत असतात तसेच इतरही महत्वाची ठिकाणे असुन नांदेड जिल्हयात काही अनुचीत प्रकार घडू नये म्हणुन सक्षम बॉम्ब शोधक व नाशक पथक वेगळ्या इमारतीत कार्यरत असुन या कार्यालयात सध्या १८ पैकी १७ पोलीस कर्मचारीच कार्यरत असुन मागील पाच महिन्यांपासून या ठिकाणी कायमस्वरुपी एकही पोलीस अधिकारी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एक निरीक्षक व पाच उपनिरिक्षक पद मंजूर असतांना एकही अधिकारी नसल्याने सध्या दहशतवादी विरोधी सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.एम.टी.निकम यांच्याकडेच कार्यभार असल्याने त्यांच्यावर कामाचा ताण पडत आहे, हे लक्षात घेता शासन कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणुन शासन स्तरावर अधिका-यांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही, नांदेड येथील बॉम्ब शोधक व नाशक पथकामध्ये कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक यांची बदली झाल्याने फेब्रुवारी-२०१८ ते मे २०१८ या कालावधीत सदर पदांचा अतिरिक्त कार्यभार सहायक पोलीस निरीक्षक, श्री. निकम यांच्याकडे देण्यात आला होता.

(२) व (३) नांदेड येथील बॉम्ब शोधक व नाशक पथक हे एक स्वतंत्र इमारतीत कार्यरत आहे.तसेच सदर ठिकाणी १८ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची पदे मंजूर असून सध्या १८ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.सदर ठिकाणी पोलीस निरीक्षकांचे पद भरण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयामध्ये शासकिय कर्मचा-यांना लाच घेतांना अटक झाल्याबाबत

**(२७) १२१२९४ (२५-०७-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये महसूल व पुनर्वसन विभागासह अन्य विभागामध्ये नागरीकांच्या कामाकरीता शासकीय अधिका-यांचे लाच मागण्याचे प्रमाण वाढले असून कागल येथील तहसीलदारासह दोन तलाठ्यांना लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे ही बाब माहे मे २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सात-बारा नोंदीसाठी पाच हजार रुपयांची लाच घेताना शिरोळ (जि.कोल्हापूर) येथील तलाठी यांना माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये गत ३ वर्षामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने किती शासकीय कर्मचाऱ्यांना पकडले आहे तसेच त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) कोल्हापूर येथील कागल तालुक्यातील तहसीलदार व दोन इतर आरोपी लोकसेवकांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक १८.०५.२०१८ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमातील कलमान्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

(२) होय,

(३) व (४) कोल्हापूर जिल्ह्यात सन २०१८ मध्ये एकुण ४१ लोकसेवक, सन २०१७ मध्ये ३४ व सन २०१६ मध्ये एकुण उप लोकसेवकांना लाचेच्या प्रकरणी अटक करण्यात येऊन त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आल आहेत.

---

## शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्याच्या ठिकाणी अपुरे पोलीस संख्याबळामुळे गुन्हेगारीत झालेली वाढ

**(२८) १२१३१० (२६-०७-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ तालुक्याच्या ठिकाणी ( जि.कोल्हापूर ) अपुरे पोलीस संख्याबळ , अपुरी कर्मचारी संख्या तसेच वाढत्या गुन्हेगारीमुळे पोलीस हतबल होत असून नेहमी ताणतणावाखाली काम करीत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरोळ पोलीस ठाण्याच्या एकूण ५२ मंजूर कर्मचारी पदांपैकी ८ पदे रिक्त असून हजर कर्मचा-यांपैकी ११ कर्मचारी प्रतिनियुक्तीवर गेलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत वरिष्ठांकडे तक्रार करूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही,

शिरोळ तालुक्यामध्ये शिरोळ,जयसिंगपूर व कुरुंदवाड अशा ०३ पोलीस ठाणेचा समावेश असून, शिरोळ पोलीस ठाणे येथे ५२ मंजूर पदांपैकी ४४ पोलीस कार्यरत आहे. जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे मंजूर संख्याबळ ३२ असून हजर संख्याबळ ४४ आहेत. तसेच कुरुंदवाड पोलीस ठाणे येथे मंजूर संख्याबळ ४५ असून, हजर संख्याबळ ३६ इतके आहेत.

शिरोळ तालुक्यातील जयसिंगपूर शहर हे नगरपालिकेचे ठिकाण आहे. शेतीमालाची मोठी बाजारपेठ आहे. शेतकरी संघटनेचे आंदोलन, मेळावे व उस परिषद ही जयसिंगपूर शहरामध्ये वारंवार होत असते. जयसिंगपूर शहराची परिस्थिती पाहता जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे मंजूर संख्याबळ हे अपुरे पडत असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्याकरिता अतिरिक्त मनूष्यबळ पुरविण्यात आले आहे. शिरोळ तालुक्यातील पोलीस ठाणे येथील दाखल गुन्हे सन २०१५ रोजी ६७६, सन २०१६ रोजी ६३३, सन २०१७ रोजी ६२४ व सन २०१८ ऑगस्ट अखेर ४५० दाखल झाले असून गुन्ह्यांमध्ये घट झालेली आहे.

(२) अंशता खरे आहे, ४ कर्मचारी प्रतिनियुक्तीवर आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न भाग क्र.१ मध्ये नमूद केल्यानुसार वस्तुस्थिती असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, अंबरनाथ या शहरातील वाहतूक कोंडीबाबत**

**(२९) १२१५५७ (३१-०७-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरात सुरु असलेली पुलांची कामे, अरुंद झालेले रस्ते, पार्किंगचा अभाव, वाहतूक पोलीसांची तोकडी संख्या, वाहतूक विभागात साहित्याचा अभाव, खराब झालेले रस्ते अशा अनेक कारणांमुळे ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, अंबरनाथ या शहरातील वाहतूक विस्कळीत झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहनांच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीसांकडे ५७० इतके वाहतूक पोलीस कार्यरत आहेत, त्यानुसार दोन शिफ्टमध्ये त्यांची विभागणी केल्यास रस्त्यावर केवळ २०० पोलीसच वाहतूक नियंत्रणासाठी उपलब्ध असून, बस, रिक्षा, चारचाकी वाहने, दुचाकी वाहनांची वाढणारी संख्या, वाहतूक विभागात मनुष्यबळ कमी असल्याने अनेक ठिकाणी वाहतूकीच्या नियोजनाचा असलेला अभाव, त्यामुळे चौकाचौकात होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्य लोकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) ठाणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात चार महानगरपालिका आणि दोन नगरपरिषदांच्या हद्दीतील वाहतूक नियमनाकरीता स्वतंत्र ठाणे वाहतूक विभाग आहे. वाहतूक विभागात माहे एप्रिल, २०१८ मध्ये १ पोलीस उपायुक्त, ४ सहायक पोलीस आयुक्त, ५८ पोलीस अधिकारी व ५८५ पोलीस कर्मचारी नेमणुकीस होते. संपूर्ण आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील वाहतुक नियमनाकरीता एकूण १८ वाहतूक उपविभाग कार्यान्वित असून उपविभागाचे कार्यक्षेत्र व तेथील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्याकरीता प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक व त्यांचे मदतीस सहायक पोलीस निरीक्षक / पोलीस उप निरीक्षक व आवश्यकतेप्रमाणे पोलीस कर्मचारी नेमण्यांत आले आहेत.

याव्यतिरिक्त वाहतूक पोलीसांच्या मदतीस ठाणे, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर महानगरपालिका तसेच अंबरनाथ नगर परिषदेकडून वार्डन पुरविण्यांत येतात. तसेच वाहतूक नियमनाकरीता होमगार्ड यांचीसुध्दा मदत घेण्यांत येते. शहरातील महत्वाचे चौक व मार्गांवर वाहतूक नियमनासाठी पोलीस अंमलदार तसेच बिट मार्शल पेट्रोलिंगसाठी दैनंदिन नेमण्यांत येतात व वाहतूक कोंडीमुळे नागरीकांना नाहक त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्यांत येते.

(३) शहरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षीत होण्यासाठी वाहतूक विभागाकडून वाहतुकीचे नियोजन करुन वाहतूक वळविणे, एक दिशा मार्ग करणे, नो पार्किंग, जड अवजड वाहनांची नियंत्रीत पध्दतीने वाहतूक इ. आवश्यकतेप्रमाणे वाहतूक अधिसूचना जारी करण्यांत आल्या आहेत. वाहतुकीस अडथळा होईल अशा व नो पार्किंगमध्ये उभ्या करण्यांत येणाऱ्या वाहनांवर टोईंग वाहनाद्वारे सदरची वाहने हटविणे, जॅमरद्वारे कारवाई करणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुध्द कारवाई करणे इ. कारवाई करण्यांत येते.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनाचालकांविरुध्द सन २०१७ मध्ये ६,१६,६३० केसेस दाखल करण्यांत आल्या असून रु. १३.४८ कोटी इतका तर माहे जानेवारी, २०१८ ते जुलै, २०१८ अखेरपर्यंत ३,९२,०१७ केसेस दाखल करण्यांत येऊन रु. ८.६६ कोटी इतके तडजोड शुल्क आकारण्यांत आले आहे. अशा प्रकारे योग्य नियोजन करुन वाहतूक सुनिश्चित करण्यांत येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एचडीआयएल या कंपनीने मुलुंडमधील गृहप्रकल्पासाठी घेतलेले कर्ज न फेडल्याचे प्रकरण

**(३०) १२६४७३ (०४-१२-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'हाऊसिंग डेव्हलपमेन्ट ॲण्ड इन्फास्ट्रक्चर लि.' (एचडीआयएल) या कंपनीने मुलुंडमधील गृहप्रकल्पासाठी घेतलेले कर्ज न फेडल्याने प्रकल्प लिलावात काढण्याची सुचना कर्ज दिलेल्या अलाहाबाद बँकेने नोटीसव्दारे एचडीआयएल कंपनी व्यवस्थापनास माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १३०० घरांच्या या प्रकल्पातील मध्यमवर्गीय ग्राहकांची घरे वाचविण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१९) :** (१) व (२) एच.डी.आय.एल. कपंनीच्या व्हिस्परींग टॉवर या प्रकल्पामधील सदनिका खरेदीदारांची फसवणूक केली म्हणून, मुलुंड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३०७/१८ भा.दं.वि. कलम ४०६ व ४२० सह कलम ४, ६, ७ मोफा कायद्यान्वये एच.डी.आय.एल. कंपनी विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला. तद्नंतर आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ७९/२०१८ अन्वये सदर गुन्हा वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.

अलाहाबाद बँकेने नोटीशीव्दारे एचडीआयएल कंपनी व्यवस्थापनास कर्ज न फेडल्याने प्रकल्प लिलावात काढण्याची सूचना माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिली आहे का, याबाबत अद्याप माहिती प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सुकापूर व कोन गावात ऑर्केस्ट्राच्या नावाखाली लेडिजबार/डान्सबार रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याबाबत**

**(३१) १२६६२७ (०६-१२-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सुकापूर व कोन गावात ऑर्केस्ट्राच्या नावाखाली लेडिजबार/डान्सबार रात्री उशिरापर्यंत सुरू राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लेडीजबार/डान्सबारमुळे होणा-या ध्वनीप्रदुषणामुळे नागरिक त्रस्त असून अनेक तरुण या डान्सबारच्या आहारी गेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त विभागातील पोलीसांच्या दुर्लक्षपणामुळेच सदर बार रात्री उशिरापर्यंतच सुरू असतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरचे सुरू असलेले बार बंद करून दुर्लक्ष करणा-या संबंधित पोलीस अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वृध्दांच्या मदतीसाठी टोल फ्री कमांक सुरु करण्याबाबत**

**(३२) १२६९१३ (०६-१२-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जेष्ठ नागरीकांवरील अत्याचाराच्या गुन्हयात सातत्याने वाढ होत असल्याने वृध्दांच्या मदतीसाठी सर्व राज्यांनी टोल फ्री कमांक सुरु करावे अशी सूचना केंद्रीय गृहमंत्रालयाने राज्य शासनास दिली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय गुन्हे नियंत्रण ब्यूरोच्या आकडेवारीनुसार राज्यात सन २०१४ ते २०१६ या तीन वर्षात अनुक्रमे ४००३, ४५८१ व ४७४७ इतक्या ज्येष्ठ नागरीकांवर झालेल्या अत्याचाराची व गुन्हेगाराची नोंद झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृध्दांच्या मदतीसाठी राज्यात टोल फ्री कमांक सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१९) :** (१), (२) व (३) सन २०१४ ते २०१६ या कालावधीत ज्येष्ठ नागरिकांवर अनुक्रमे ३९८१, ४५६१ व ४६९४ इतक्या गुन्हयांची नोंद करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरीकांच्या मदतीसाठी विनाशुल्क १०९०, १०९१, १०३ ही हेल्पलाईन सेवा सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(३३) १२६९८२ (१०-१२-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोणत्याही नागरिकांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी झटणा-या व संविधानिक दर्जा असलेल्या महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगातील अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी आयोगाकडे दाखल होणा-या तक्रारींची पडताळणी करण्याच्या कामावर विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे
(२) आणि (३) राज्य मानवी हक्क आयोगाच्या अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार आयोगातील सदस्याकडे सोपविण्यात आला आहे. आयोगावरील अध्यक्ष आणि एक सदस्य या पदावरील नियुक्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

२. राज्य मानवी हक्क आयोगावरील सचिव ह्या पदावर सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दिनांक १६/११/२०१८ अन्वये श्री.व्ही.के.गौतम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
३. आयोगावरील विशेष पोलीस महानिरिक्षक पदावर सुयोग्य अधिका-याची नियुक्ती करण्यात येत आहे.
४. पोलीस अधीक्षक,पदावर गृह विभाग, शासन निर्णय दिनांक १६/१०/२०१८ अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिवराआश्रम ( ता.मेहकर, जि.बुलढाणा) व देऊळगावराजा ( जि.बुलढाणा) येथील आठवडी बाजारात मोबाईल चोरी करणारी टोळी सक्रिय असल्याबाबत**

**(३४) १२८०१५ (०६-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिवराआश्रम ( ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे मंगळवारी होणा-या आठवडी बाजारातून मोबाईल चोरणा-या एका चोरट्याला दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच देऊळगावराजा ( जि.बुलढाणा) येथील आठवडी बाजारातून मोबाईल चोरणा-या एका चोरट्याला दिनांक १३ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आठवडी बाजारांतून मोबाईल चोरी करणारी टोळी सक्रिय आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण टोळीला पकडण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१९) :** (१) हिवराआश्रम (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे मंगळवारी होणा-या आठवडी बाजारातून मोबाईल चोरणाऱ्या एका विधी संघर्ष बालकास ताब्यात घेऊन अप.क्र.१५५/१८, भादंवि कलम ३७९, ५११ दाखल करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

पोलीस स्टेशन देऊळगांव राजा येथे मोबाईल चोरी संदर्भात माहे जुलै मध्ये मोबाईल चोरीचा एकही गुन्हा दाखल नाही. देऊळगांवराजा येथे सन २०१८ मध्ये माहे जानेवारी, एप्रिल, जुन व ऑगस्ट महिन्यात प्रत्येकी एक याप्रमाणे मोबाईल चोरीच्या ४ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली त्यापैकी माहे एप्रिल व जून मधील गुन्हे उघडकीस आले आहेत. तपासात कोणतीही टोळी सक्रीय असल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशी (नवी मुंबई ) सेक्टर १५ मधील एका शाळेत विद्यार्थीनीवर झालेला अत्याचार

**(३५) १२८४२० (१०-१२-२०१८). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी (नवी मुंबई ) सेक्टर १५ मधील एका शाळेत इयत्ता चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थीनीवर अनोळखी व्यक्तीने शाळेतील शौचालयात लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील अनेक शाळांमध्ये यापूर्वी सुध्दा शाळेकरी लहान मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाशी (नवी मुंबई ) सेक्टर १५ मधील शाळेतील इयत्ता चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यांत आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अशाप्रकारे शाळेतील विद्यार्थीनींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) एम.जी.एम. स्कुल, नेरूळ या शाळेतील सातवीत शिकणा-या मुलीवर त्याच शाळेतील शिक्षकाने लैंगिक अत्याचार केल्याबाबत नेरूळ पोलीस ठाणे येथे दिनांक २९/०९/२०१६ रोजी गु.र.नं. ३९०/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) व (४) शाळेतील विद्यार्थीनींवर लैगिक अत्याचार करणाऱ्या दोषींवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-
घटना क्र. १ :- वाशी (नवी मुंबई ) सेक्टर १५ मधील शाळेतील इयत्ता चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून वाशी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.नं. ३६७ /२०१८ भादवि कलम ३७६ (ए) (बी), ३६३, ५०६(२) बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४, ६ अन्वये अज्ञात इसमा विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आज रोजी पर्यंतच्या पोलीस तपासात सदर घटना कल्पित असून फिर्यादीने गैरसमजूतीतून तक्रार केल्याचे निष्पन्न झाले आहे. यानुषंगाने नमूद गुन्ह्याची " क " वर्ग समरी करणेबाबत मा. विशेष सत्र न्यायालय, ठाणे येथून मंजूरी येणे बाकी आहे.
घटना क्र. २ :- एम.जी.एम. स्कुल, नेरूळ या शाळेमध्ये लहान मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून नेरूळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३९०/२०१६ भादवि कलम ३७६(एफ) (आय) (एन), ५०६ (ब), सह बालकाचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम (पोस्को) २०१२ कलम ४, ५ (फ), (एल), (जे-२), ६,८,९(एफ), १० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक १५/१२/२०१६ रोजी अटक करण्यात आली. अटक आरोपी विरूध्द मा. विशेष जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायाप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मनमाड (ता.नांदगांव,जि.नाशिक) शहरातील पोलिस ठाण्यामध्ये पोलिस कर्मचा-यांच्या अपु-या संख्येबाबत

**(३६) १२९८४४ (०६-१२-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनमाड (ता.नांदगांव,जि.नाशिक) शहरातील सव्वा लाख लोकसंख्या असलेल्या पोलिस ठाण्यामध्ये पोलिस कर्मचा-यांची संख्या अपुरी असून शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर मोठ्याप्रमाणात ताण पडत असून कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनमाड शहरातील पोलिस ठाण्यामध्ये पुरेशा प्रमाणात पोलिस कर्मचा-यांची नेमणूक करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) मनमाड पोलीस ठाणे येथे १२६ पदे मंजुर आहेत. सद्यस्थितीत तेथे ६४ पोलीस अधिकारी /कर्मचारी कार्यरत आहेत.तसेच तेथे २ आरसीपी प्लाटून मध्ये एकूण ६७ पोलीस कर्मचारी नेमण्यात आले आहेत. मनमाड शहरात असे एकूण १३१ पोलीस कर्मचारी/अधिकारी कार्यरत आहे. तसेच महत्वाचे बंदोबस्तकामी पोलीस मुख्यालय येथून वेळोवेळी अतिरिक्त बंदोबस्त देण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर शहरातील कायदा व सुव्यवस्थेसाठी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(३७) १३००८३ (०६-१२-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि. ठाणे) या शहरात विविध औद्योगिक व्यवसायाच्या व्यापारपेठा कार्यरत आहेत तसेच लोकसंख्येच्या दृष्टीने शहराचा क्रमवारी वरच्या श्रेणीमध्ये आहे त्यामुळे शहराच्या हद्दीतील सर्वच पोलीस स्टेशनमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण दरदिवशी वाढत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुन्हेगारीला प्रतिबंधित करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनास विनंती केली असून सीसीटीव्ही सर्व्हेलन्स यंत्रणा व व्हेईकल ट्रॅकींग प्रणाली बसविण्याचे धोरण गृहविभागाने निश्चित करणे आवश्यक असल्याचे नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रं. स्थाविका/११५/प्र.क्रं.१८७/का-११८२, दिनांक डिसेंबर २०१५ रोजी वा त्या सुमारास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :**(१) उल्हासनगर शहर हद्दीत सन २०१७ ऑक्टोबर अखेर एकूण ११७५ गुन्हे दाखल झालेले असून २०१८ ऑक्टोबर अखेर १२०३ गुन्हे दाखल झाले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत २८ गुन्ह्यांची वाढ झाली आहे.
(२) व (३) गृह विभाग, शासन निर्णय दि.०९.०१.२०१७ अनुसार राज्यातील विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेनगाव (ता.सेनगाव, जि. हिंगोली) येथील न्यायालयाच्या नवीन इमारत बांधकाम करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत जमीन खरेदीत गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(३८) १३०७४९ (११-१२-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (ता.सेनगाव, जि. हिंगोली) येथील न्यायालयाच्या नवीन इमारत बांधकाम करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत जी जमीन खरेदी केली जात आहे त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन सेनगाव शहरापासून दूर व लोकांच्या सोयीची नसलेली असून २६०० रुपये प्रति चौरस फुट जमीन विकत घेण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री रमेश जीरवनकर व श्रीमती किशोरबाई जीरवनकर यांची जमीन सेनगाव शेहराच्या बाजूला असलेली गट क्र. २ मधील १ हेक्टर ८१ आर व गट क्र. २ मधील ० हेक्टर ५९ आर अशी एकूण २ हेक्टर ४० आर जमीन केवळ १६०० रुपये चौरस फुट ने देण्यास तयार आहेत तसा त्यांनी रितसर अर्ज जिल्हा प्रशासनाकडे दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा प्रशासनाच्या या चुकीच्या निर्णयामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) : (१)** हे खरे नाही. हिंगोली येथील न्यायालयाच्या नवीन इमारतीसाठी जमीन खरेदी करण्याचा प्रस्ताव प्राथमिक स्तरावर असून जिल्हा स्तरीय दर निश्चिती समिती मार्फत दर निश्चिती झाली नसल्याने गैर व्यवहार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे जिल्हाधिकारी हिंगोली यांनी दिनांक ०२/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) हे खरे नाही.सदर जमीन ही सेनगांव तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालय सेनगांव या दोन्ही कार्यालयांमधील मोकळी जागा आहे.शिघ्र सिध्द गणकानुसार या जागेचे दर रुपये २८००/- प्रति चौरसमीटर आहेत असे जिल्हाधिकारी हिंगोली यांनी दिनांक ०२/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे

सेनगाव येथील न्यायालय इमारत व न्यायाधिश निवासस्थानाकरीता खाजगी जमीन संपादीत करण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप मा.उच्च न्यायालयाकडे मंजुरीस्तव प्रलंबीत आहे असे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश परभणी यांनी दिनांक २८/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे

(३) होय हे खरे आहे.अर्जदारांनी तसा अर्ज दिला असल्याचे जिल्हाधिकारी हिंगोली यांनी दिनांक ०२/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**राज्यातील २५० शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा सुधारण्यासाठी केंद्र शासनाकडून मिळालेला निधी बँकाकडे पडून असल्याबाबत**

**(३९) १३११४९ (१०-१२-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २५० शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा (आयटीआय) दर्जा सुधारण्यासाठी केंद्र सरकारकडून सन २००७ ते २०११ या चार वर्षात सुमारे ६२५ कोटी रुपये मिळालेल्या निधीचा पुरेपूर वापर न झाल्याने कोट्यवधी रुपयांचा निधी बँकामध्ये पडून असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी बँकाकडे पडून राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर संस्थामधील आय.एम.सी. च्या अकार्यक्षमतेमुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा (आय.टी.आय) चा विकास रखडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०२-२०१९) :** (१) अशंत: खरे आहे.

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजनेंतर्गत राज्यातील २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा सुधारण्यासाठी केंद्र शासनाकडून सन २००७ ते २०११ या चार वर्षात टप्प्याटप्याने एकूण रु. ६२५.०० कोटी रक्कम कर्ज स्वरुपात प्राप्त झाली आहे. त्यापैकी रु.१७१.६० कोटी इतकी रक्कम खर्च झालेली आहे.

(२) केंद्र शासनाच्या दिनांक २४ जून, २०१० च्या पत्रामधील सुचनांनुसार सदर प्राप्त झालेल्या रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम बिज भांडवल (Seed Money) म्हणून संस्था व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यात जमा करणे बंधनकारक होते. त्यानुसार एकूण रु. ६२५.०० कोटी रक्कमेपैकी रु. ३१२.५० कोटी इतकी रक्कम बिज भांडवल (Seed Money) म्हणून बँकेमध्ये जमा करण्यांत आलेली आहे. तद्नंतर केंद्र शासनाच्या दिनांक २१ जुलै, २०१४ च्या पत्रानुसार २० टक्के रक्कम म्हणजे रु.१२५ कोटी इतकी रक्कम बिज भांडवल (Seed Money) म्हणून संस्था व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यामध्ये जमा असणे आवश्यक असून सदर रक्कम खर्च करावयाची नाही. उर्वरित रक्कमेपैकी रु. १७१.६० कोटी इतका खर्च झालेला आहे. खर्च कमी होण्यांची कारणे पुढील प्रमाणे आहेत :-

अ) संस्था विकास आराखडयात सेंटर ऑफ एक्सलन्स (COE) हा अभ्यासक्रम प्रस्तावित असलेल्या संस्थांतून वर्ष २०१४ पासून केंद्र शासन व राज्यशासनाच्या सुचनेनुसार योजना बंद झाल्याने खर्च कमी झाला आहे.

ब) राज्य सुकाणू समितीच्या दिनांक १५ मे, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत जो पर्यंत योजनेचा आढावा होत नाही तो पर्यंत फक्त निदेशकांचे मानधन व ऑडीट फी या व्यतिरिक्त कोणताही खर्च करण्यांत येवु नये, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

क) संस्था विकास आराखडा (IDP) चे काही सहयोगी उदयोजक व संस्था व्यवस्थापन समिती (आय.एम.सी) यांनी प्रभावीपणे अंमलबजावणी केलेली नाही. काही संस्था व्यवस्थापन समिती (आय.एम.सी) मधील सहयोगी उद्योजकांचा सक्रीय सहभाग नसल्यामुळे व योजनेप्रती असलेली अनास्था देखील खर्च कमी होण्याचे कारण आहे.

संस्था व्यवस्थापन समिती ( आय.एम.सी ) च्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य स्तरावर राज्य सुकाणू समितीची स्थापना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१ मार्च, २००८ अन्वये करण्यात आलेली आहे.

राज्य सुकाणू समितीच्या दिनांक २०.०१.२०१८ व दिनांक ०९.०३.२०१८ च्या बैठकांमध्ये निधीचा पुरेपुर वापर करुन राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करण्यांसाठी खर्चावरील निर्बंध उठविण्यात आले असून, पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत आलेले आहेत :-

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षणासाठी व ऑनलाईन परीक्षा संस्था स्तरावर घेण्यांसाठी २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सामाईक माहिती तंत्रज्ञान विषयक साधन सामुग्री विकसित करणे आवश्यक असल्याने प्रत्येक संस्थेमध्ये अद्ययावत आय.टी. लॅब व दूरस्थ प्रशिक्षणासाठी व्हर्च्युअल क्लासरूम विकसित करावे.

२. सदर आय.टी. लॅब व व्हर्च्युअल क्लासरूम चा वापर इतर संस्थांच्या कामासाठी करुन संस्था व्यवस्थापन समितीने ( आय.एम.सी ) उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करावेत.

३. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप अंतर्गत २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील संस्था व्यवस्थापन समितीकडून किरकोळ खर्च करण्यासाठी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

४. केंद्र शासनाने विहित केलेल्या सुधारीत संस्था विकास आराखडा (IDP) च्या नमुन्यात सुधारीत संस्था विकास आराखडा (IDP) तयार करण्यांस राज्य सुकाणू समितीने मंजूरी दिलेली आहे.

५. संस्थेच्या विस्तार आराखड्यानुसार क्षमतावाढ करणे तसेच या विस्तार आराखड्यानुसार संस्था विकास आराखडा तयार करणे.

(३) अंशत: खरे आहे. काही संस्था व्यवस्थापन समिती ( आय.एम.सी) मधील सहयोगी उद्योजक पुरेसे सक्रिय नसल्यामुळे निधी कमी प्रमाणात खर्च झाला आहे, त्यामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा विकास पूर्ण झाला नाही.

(४) व (५) पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप द्वारे १३९६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा वाढ करणे या योजनेचा सर्वकष आढावा घेण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.२१.०२.२०१५ अन्वये श्री. के. एम. गेडाम, माजी संचालक यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीने आय.एम.सी च्या अकार्यक्षमतेबाबत केलेल्या शिफारशी व त्यावर राज्य सुकाणु समितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचेकडून कार्यरत सक्रिय सहयोगी उद्योजकांची निवड करण्यात आली आहे. तसेच, निष्क्रीय सहयोगी उद्योजक बदलण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे.

---

### सोलापूर शहरातील दयानंद महाविद्यालय परिसरात पोलीसांची गस्त वाढविण्याबाबत

**(४०) १३१५३८ (०८-१२-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील दयानंद महाविद्यालय परिसरात समाजकंटकांकडून छेडछाडीचे प्रकार होत असल्याने दयानंद महाविद्यालय व परिसरात पोलीसांची गस्त वाढविण्याबाबत स्थानिक मा. लोकप्रतिनिधींनी पोलीस आयुक्त, सोलापूर यांना माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने स्थानिक पोलीस स्टेशनकडून कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी विद्यार्थीनीच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना म्हणुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने दि. ०४/१०/२०१८ रोजी दयानंद महाविद्यालय येथील मुले व मुली यांची बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये महिला सुरक्षिततेबाबत व महिला विषयक कायद्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीमध्ये महाविद्यालयीन मुला/ मुलींच्या तसेच प्राचार्य यांच्या अडी अडचणी समजून घेण्यात आल्या व महाविद्यालयाचे प्राचार्य यांना महाविद्यालय परीसरात आणखी सिसिटीव्ही कॅमेरे व तक्रार पेट्या बसविण्याबाबत सूचना दिल्या. तसेच दयानंद महाविद्यालय व परिसरात पेट्रोलिंग करण्याच्या लेखी सूचना बिट मार्शल व दामिनी बिट मार्शल यांना देण्यात आल्या आहेत. सदर परीसरात दिवसभरात वेळोवेळी पेट्रोलिंग करणे व रोड रोमियोंकडून मुलींच्या छेडछाडीचे प्रकार निदर्शनास आल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना समक्ष व दैनंदिन हजेरीवर देण्यात आल्या आहेत. दामिनी बिटमार्शल, जोडभावी पेठ बिटमार्शल, पी.सी.आर. मोबाईलच्या गस्ती कॅालेजचे वेळेत, दयानंद कॅालेजच्या परिसरात चालू असून योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अहमदनगर येथील लोकखाना परिसरात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याबाबत

**(४१) १३१६६३ (१०-१२-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील लोकखाना परिसरात पदमशाळी समाजातील ११ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे प्रकरण जलदगतीने न्यायालयात चालविण्याबाबत, पिडीतेच्या कुटूंबाला पोलीस संरक्षण देण्याबाबत, पिडीतेच्या पुनर्वसनासाठी शिक्षणाची व नोकरीची हमी तसेच पिडीत मुलीच्या कुटुंबाला शासनातर्फे २५ लाख रुपयांची तातडीची मदत जाहीर करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गु.र.नं. ४५६/२०१८ भा.दं.वि. कलम ३७६(अ)(ब), ३५४,३२३,५०६,३४ व बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ५(एम), ६ व १७ प्रमाणे ०२ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. १ यास अटक करण्यात आली असून सदर आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपी क्र. २ हिस मा. न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजूर केल्याने सध्या जामीनावर मुक्त आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले असून सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद येथील नविन न्यायालयामध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी निधीची उपलब्धता करणेबाबत

**(४२) १३१७५६ (११-१२-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंब, (ता. कळंब,जि. उस्मानाबाद) येथे शासनाने रुपये ३६६.७९ लक्ष खर्चून नविन न्यायालयाची इमारती बांधलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतीमध्ये फर्निचर, अंतर्गत रस्ते व पार्किंगची व्यवस्था अभावी गत दोन-तीन वर्षांपासून सदर इमारत धुळ खात पडलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु नविन न्यायालयीन इमारतीमध्ये फर्निचर, अंतर्गत रस्ते व पार्किंग या विविध कामांसाठी लागणारा निधी मागणीचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव विधी व न्याय यांच्याकडे जा.क्र.बी (डब्ल्यू) १९१० चा १९८६/१११४/१७४२२, दिनांक ८ मे, २०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहु नविन न्यायालय इमारतीचा उपयोग होण्यासाठी निधीची उपलब्धता करून तेथे न्यायालय कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०१९) :** (१) होय.
(२) नाही, कळंब, ता.कळंब, जिल्हा उस्मानाबाद येथील न्यायालय इमारतीचे बांधकाम दिनांक ३१ जुलै, २०१८ रोजी पूर्ण झाले आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने काही मुद्यांची माहिती आवश्यक असल्यामुळे शासन पत्र दिनांक १२ जुलै, २०१८ च्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांच्याकडून माहिती मागविली असता, सदर माहिती मा.प्रमुख जिल्हा न्यायाधिश, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांचेकडून दिनांक ०१ डिसेंबर, २०१८ रोजी प्राप्त झाली आहे. परंतू प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्यामुळे शासन पत्र दिनांक १०.०१.२०१९ अन्वये मा.प्रमुख जिल्हा न्यायाधिश, जिल्हा न्यायालय उस्मानाबाद यांचेकडून माहिती पुन:श्च मागविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाढोणा बाजार (ता. राळेगांव, जि.यवतमाळ) परीसरामध्ये अवैध धंदे सुरू असल्याबाबत**

**(४३) १३२१२४ (१०-१२-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढोणा बाजार (ता. राळेगांव, जि.यवतमाळ) व परीसरामध्ये १० ते १५ खेडी असून लोकांची वाढोणा बाजार येथे वर्दळ असते, त्या भागातील नागरीकांनी दिलेल्या तक्रारीवरुन अधिका-यांच्या दुर्लक्षपणामुळे या परीसरात ऑनलाईन लॉटरीच्या नावावर अवैध धंदे, वरली मटका जुगार मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार संबंधीत दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

वाढोणा बाजार (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) हे गांव पो.स्टे. वडकी अंतर्गत येते. त्या भागातील नागरीकांकडून कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त नाही. तथापि सन २०१८ मध्ये माहितीच्या आधारे छापे टाकून वाढोणा बाजार येथे वरली मटका जुगारावर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये १२ केसेस दाखल केल्या असून रु.२७,५२५/- इतका माल जप्त करुन २३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) येथील पोलीस स्टेशन व पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतीचे बांधकाम करण्याबाबत**

**(४४) १३२१२५ (०६-१२-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) येथील पोलीस स्टेशन व पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतीची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून पोलीस स्टेशनच्या चारही बाजूने दुर्गंधीयुक्त घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे, तसेच पोलीस स्टेशनमध्ये अनेक सुविधांचा अभाव आहे, पावसाळ्यात तर ताडपत्री टाकून काम करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस स्टेशन व पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतीचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) व (२) नेवासा पोलीस ठाण्याची प्रशासकीय इमारत तसेच नेवासा पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता सेवानिवासस्थाने बांधकामाबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांच्याकडे असून सदर प्रकल्पाकरिता मे.ध्रुवतारा कन्सल्टन्स, अहमदनगर यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीबी पोलिस स्टेशन अंतर्गत देऊळगाव कोळ ( जि.बुलढाणा ) येथील अवैध दारू बंद करण्याबाबत**

**(४५) १३२३९७ (१०-१२-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीबी पोलिस स्टेशन अंतर्गत देऊळगाव कोळ ( जि.बुलढाणा ) येथील अवैध दारू अड्डे बंद करण्याबाबत ग्रामस्थांनी दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी वा सुमारास मा. मुख्यमंत्री, गृहराज्यमंत्री, पालकमंत्री, पोलिस अधिक्षक व जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना लेखी निवेदने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

बीबी पोलिस स्टेशन अंतर्गत देऊळगाव कोळ (जि.बुलडाणा) येथील अवैध दारू अड्डे बंद करण्याबाबत ग्रामस्थांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी समस्त गावकरी महिला मंडळी यांचेकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) सन २०१८ मध्ये चोरुन लपून दारु विक्री करणाऱ्या ६ व्यक्तींविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ ई खाली गुन्हे दाखल केले आहेत. तसेच सन २०१८ अखेर दारुबंदी कायद्यान्वये एकूण ७२ गुन्हे दाखल असून रु.८४,९०५/- इतका माल जप्त करण्यात आला आहे. तर ३१ व्यक्तींवर मुंबई दारुबंदी कायद्या कलम ९३ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे व ५ व्यक्तींविरोधात प्रतिबंधक कारवाई व हद्दपारी प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड व यवत (ता. दौंड, जि. पुणे) पोलीस स्टेशन हद्दीत गावठी कट्टे हस्तगत करण्यात आल्याबाबत

**(४६) १३२७९६ (१०-१२-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड व यवत (ता. दौंड, जि. पुणे) पोलीस स्टेशन हद्दीत अनेक तरुणांकडून मोठ्या संख्येने गावठी कट्टे हस्तगत करण्यात आले असल्याची बाब माहे सप्टेंबर ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील पकडण्यात आलेले गावठी कट्टे हे उत्तर प्रदेश व बिहार या राज्यामधून आणले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून दोषी आढळणा-या आरोपींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) होय, ५ गावठी कट्टे व २७ राऊंड हस्तगत करण्यात आले आहे.

(२) यातील १ गावठी कट्टा हा याच गुन्ह्यातील आरोपी रा. पुणे, मुळ गाव उत्तरप्रदेश यांचेकडून विकत घेतला असल्याचे चौकशीत निदर्शनास आले.

(३) सदर प्रकरणी यवत पोलीस स्टेशन येथे खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) दोन आरोपीविरुध्द गु.र.नं. ८९३/२०१८, शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ सह भादवि कलम ३४ प्रमाणे दि. २३/०९/२०१८ रोजी गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यातील एका आरोपीस अटक केली असून सध्या तो जामिनावर मुक्त आहे. एक आरोपी फरार आहे.

२) पाच आरोपीविरुध्द गु.र.नं. ९५९/२०१८ भादवि कलम ३९९,४०२,३५३,३३२ सह शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ प्रमाणे दि. २/१०/२०१८ रोजी गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक केली असून ते न्यायालयीन कोठडीत आहेत. तीन आरोपी फरार आहेत.

३) चार आरोपी विरुध्द गु.र.नं. २४३/२०१८ शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३(१) २५ प्रमाणे दि. १५/०३/२०१८ रोजी गुन्हा दाखल आहे.यातील ४ आरोपींना अटक केली असून त्यापैकी एक जामिनावर मुक्त आहे.
४) एका आरोपी विरुध्द गु.र.नं. ८००/२०१८ शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ प्रमाणे दि. ३१/०८/२०१८ रोजी गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यातील आरोपीस अटक केली असून सद्या तो जामिनावर मुक्त आहे. वरील सर्व गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद अध्यक्ष,उपाध्यक्ष यांच्यासह समिती सभापती आणि सदस्यांना मंत्रालयात तात्काळ ओळखपत्र देण्याबाबत**

**(४७) १३३४३३ (११-१२-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासह समिती सभापती आणि सदस्यांना मंत्रालयात विविध खात्याच्या मंत्र्यांच्या दालनात बैठकीसाठी तसेच प्रस्ताव सादर करण्याकरिता उपस्थित राहावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सदस्यांना मंत्रालयात जाताना ओळखपत्राविना सोडले जात नसल्याने सदस्यांची अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त सदस्यांना तात्काळ ओळखपत्र देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील जिल्हा परिषदांचे सदस्य,विषय समित्यांचे सभापती,पंचायत समिती सदस्य, व ग्रामापंचायत सरपंच यांना ओळखपत्र देण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाचे दि.११/०२/२०१४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून त्यांअनुषगांने त्यांना संबंधीत जिल्हा परिषद यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी/पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्या सहीने ओळखपत्र दिले जात आहे. गृह विभागाचे शासन परिपत्रक दि.०१/०१/२०११ अन्वये सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष यांना मंत्रालयाचा एक वर्षाचा तात्पुरते प्रवेश पास दिला जातो.जिल्हा परिषदाचे इतर सदस्य/समिती सभापती आणि सदस्य यांना सुध्दा त्यांच्या ओळखपत्राच्या आधारे मंत्रालय दैनंदिन प्रवेशपास दिला जातो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ येथे बनावट कागदपत्रांद्वारे नागरिकांचे भूखंड परस्पर नावावर करुन घेतल्याबाबत**

**(४८) १३३५३० (१०-१२-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथे बनावट मालक उभा करुन खोटे कागदपत्र सादर करुन नागरिकांचे भूखंड परस्पर नावावर करुन घेतले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालकीचे नसलेल्या या एकाच भूखंडावर तिऱ्हाईताने एकापेक्षा अधिक बँकामधून कोट्यवधी रुपयांचे कर्ज काढलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोट्यवधी रुपयांच्या या भूखंड घोटाळ्यातील काही आरोपींनी जबानीत उल्लेख केलेली नावे स्थानिक पोलीस प्रशासनाने रेकॉर्डवर घेतलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शासनाने या घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

यवतमाळ येथील भूखंड घोटाळ्या प्रकरणी नोंद असलेले तीन गुन्ह्यातील १६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांना विचारपूस करण्यात आली असून त्यांनी सांगितल्या प्रमाणे माहिती अभिलेखावर घेण्यात आली असून त्याची शहानिशा करुन पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(४) भूखंड घोटाळ्या प्रकरणी नोंद असलेल्या गुन्ह्याच्या तपासासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांचे नेतृत्वात विशेष तपास पथकाकडून गुन्ह्यांचा तपास सुरु आहे. तिन गुन्ह्यांपैकी एक गुन्हा न्यायप्रविष्ठ असून उर्वरीत दोन गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील औद्योगीक शिक्षण संस्थेच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण होऊनही फर्निचर अभावी इमारत बंद असल्याबाबत**

**(४९) १३३८५५ (१०-१२-२०१८). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील औद्योगीक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण होऊनही फर्निचर अभावी सदरहु इमारतीचा वापर ब-याच दिवसापासुन बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीचा वापर करण्यासाठी फर्निचर पुरवुन सदरहू इमारतीचा वापर सुरू करण्याबाबत शासनाकडुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१३-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
औद्योगिक प्रशिक्षण संस्था,कोपरगाव, जिल्हा अहमदनगर या संस्थेचे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असून, इमारतीचे अंतर्गत फिनीशिंग बाबी व कार्यशाळेचे फ्लोरींग व अंतर्गत/बाह्य विद्युतीकरण ही कामे अपूर्णावस्थेत आहेत.
(२) होय,हे खरे आहे.
(३) व (४) संस्थेच्या इमारतीचे बांधकामासाठी दि.०७.११.२००८ च्या शासन निर्णयान्वये रक्कम रू. ४६६.४५ लाख इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. परंतु प्रत्यक्ष काम करतेवेळी दरसूचीच्या बदलामुळे आतापर्यंत इमारत बांधकामासाठी रु.५०३.७५ लाख खर्च झाला आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आता रु.६३०.९४ लाख रक्कमेचे सुधारीत अंदाजपत्रक प्राप्त झाले आहे. सदर सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर व आवश्यक तरतूद प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत कामे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून पूर्ण करून घेण्यात येतील.

---

**चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लाच मागितल्याप्रकरणी अटक करण्यात आल्याबाबत**

**(५०) १३३९२९ (१०-१२-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चंद्रपूर येथील मुख्यालयात कार्यरत असलेले प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मारोती पोटे यांनी भद्रावतीच्या श्री.शिंदे यांच्याकडून एका बँकेच्या अध्यक्षा करीता आणि स्वत: करीता एक लाख रूपयांच्या लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे स्पष्ट झाल्याने दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास सापळा रचण्यात आला असता सदर रक्कम घेण्यास नकार दिला मात्र लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मारोती पोटे यांना अटक केली असल्याची माहिती दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले व तद्नुसार याप्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) (२) व (३) होय,

आरोपी मारोती विठोबा पोटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर यांनी लोकसेवक पदाचा गैरवापर करून शासकिय काम अप्रामाणिकपणे करण्याच्या उद्देशाने यातील तक्रारदार यांना त्यांचे बँकेत तारण असलेल्या शेतजमिनीचे विक्री करिता बँकेचे परवानगीपत्र देण्याचे कामाकरिता आरोपीने पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रू. लाच रक्कमेची पंचासमक्ष सुस्पष्ट मागणी करून प्राथमिक पडताळणी मध्ये लाच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी विरूध्द दि. १०.१०.२०१८ रोजी पोलीस स्टेशन रामनगर जिल्हा चंद्रपूर येथे अपराध क्रमांक ११०२/२०१८ कलम ७ (अ) ला.प्र.का. (सुधारित) सन २०१८ अन्वये गुन्हा नोंद असुन आरोपीस अटक करण्यात आले आहे व तपास सुरू आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.